महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०१८ (लिपिक-टंकलेखक, दुय्यम निरीक्षक व कर सहायक) पेपर क्र. २ (स्वतंत्र पेपर) (कर सहायक)
परीक्षा दिनांक - २ डिसेंबर, २०१८

**A** → संच क्रमांक

**2018** **N12**

प्रश्नपुस्तिका क्रमांक / **BOOKLET NO.** 206005

**प्रश्नपुस्तिका – II**

**सामान्य क्षमता चाचणी व पदासंबंधीचे / विषयासंबंधीचे ज्ञान**

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | शेवटचा अंक | |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. खालील विधाने विचारात घ्या :

भारतात महानगर नियोजन समिती ही ..........

(a) भारतीय राज्यघटनेतील तरतूदीनुसार गठीत करण्यात आली आहे.

(b) महानगर क्षेत्रासाठी विकास आराखड्याचा मसूदा तयार करते.

(c) महानगर क्षेत्रातील शासनाच्या प्रायोजित योजनांच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी पार पाडण्याची असते.

वरील विधानांपैकी कोणते विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) आणि (b) (2) फक्त (b) (3) (a) आणि (c) (4) (a), (b) आणि (c)

Consider the following statements :

In India, a Metropolitan Planning Committee -

(a) Is constituted under the provisions of the Constitution of India.

(b) Prepares the draft development plans for metropolitan area.

(c) Has the sole responsibility for implementing Government sponsored schemes in the metropolitan area.

Which of the statements given above is/are **correct** ?

(1) (a) and (b) (2) (b) only (3) (a) and (c) (4) (a), (b) and (c)

---

2. भारतात खालीलपैकी कोणत्या शहरात महानगर पालिका सर्वप्रथम स्थापन झाली ?

(1) मद्रास (2) दिल्ली (3) कलकत्ता (4) मुंबई

Which among the following cities the First Municipal Corporation was set up in India ?

(1) Madras (2) Delhi (3) Calcutta (4) Mumbai

---

3. राज्यस्तरावर राज्य सरकारने राज्य निर्वाचन आयोगाची निर्मिती भारतीय संविधानाच्या कोणत्या कलमानुसार केलेली आहे ?

(1) 242 (K) (2) 344 (K) (3) 243 (K) (4) 324

According to which of the following Article of the Constitution, the State government has created the State Election Commission at the state level ?

(1) 242 (K) (2) 344 (K) (3) 243 (K) (4) 324

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

4. राज्य विधिमंडळाच्या विशेषाधिकाराबाबत खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) राज्य विधिमंडळाच्या सभागृहाच्या कामकाजात सहभागी होणाऱ्या आणि भाषण करणाऱ्या व्यक्तिंनाही राज्यघटनेने राज्य विधिमंडळाचे विशेष अधिकार दिले आहेत.

(2) राज्यपाल हा देखील राज्य विधिमंडळाचा एकात्मिक भाग असल्याने राज्यघटनेने त्यांनाही राज्य विधिमंडळाचे विशेष अधिकार दिले आहेत.

(3) सभागृहाच्या प्रमुखाच्या अनुमतीशिवाय गृहाच्या आवारात कोणत्याही व्यक्तिला अटक करता येत नाही.

(4) वरीलपैकी एकही नाही

Which one of the following statements regarding the privileges of the State legislature is **false** ?

(1) The Constitution has extended the privileges of the State legislature to those persons who are entitled to speak and take part in the proceedings of a House of the State legislature.

(2) The Constitution has also extended the privileges of the state legislature to the governor who is also an integral part of the State legislature.

(3) No person can be arrested within the precincts of the House without the permission of the presiding officer.

(4) None of the above

---

5. **विधान (A) :** मुख्यमंत्री राज्य सरकारच्या मंत्र्याला पदावरुन दूर करू शकतो.

**विधान (R) :** मुख्यमंत्री राज्य मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो.

(1) दोन्हीही **(A)** आणि **(R)** विधाने बरोबर आहेत आणि **(R)** हे विधान **(A)** चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(2) दोन्हीही **(A)** आणि **(R)** विधाने बरोबर आहेत परंतु **(R)** हे विधान **(A)** चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(3) विधान **(A)** बरोबर परंतु **(R)** हे चुकीचे.

(4) विधान **(A)** चुकीचे परंतु **(R)** हे बरोबर.

**Statement (A) :** The Chief Minister can dismiss a minister of the State government.

**Statement (R) :** The Chief Minister is the head of the State Council of ministers.

(1) Both **(A)** and **(R)** statements are true and **(R)** is the correct explanation of **(A)**.

(2) Both **(A)** and **(R)** statements are true but **(R)** is not a correct explanation of **(A)**.

(3) Statement **(A)** is true but **(R)** is false.

(4) Statement **(A)** is false but **(R)** is true.

---

6. खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) विधान परिषदेतील सदस्यांची कमाल संख्या विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांश असते.

(2) भारतीय राज्यघटनेने विधान परिषदेतील सदस्यांची किमान संख्या 40 निश्चित केलेली आहे.

(3) विधान परिषदेच्या संरचनेमध्ये बदल करण्याचा अधिकार राष्ट्रपतीस आहे.

(4) जम्मू-काश्मीर राज्याच्या राज्यघटनेनुसार जम्मू आणि काश्मिरच्या विधान परिषदेत 36 सदस्य आहेत.

Which one of the following statements is **false** ?

(1) The maximum strength of the legislative council is fixed at one-third of the total strength of the Assembly.

(2) The minimum strength of the legislative council is fixed at 40 by the Constitution of India.

(3) The President is authorised to modify the scheme of composition of a legislative Council.

(4) The Legislative Council of Jammu and Kashmir has 36 members under the provision of its own state Constitution.

---

7. 'अखिल भारतीय सेवांचे' जनक कोण ?

(1) पंडीत जवाहरलाल नेहरू (2) सरदार वल्लभभाई पटेल

(3) डॉ. बी.आर. आंबेडकर (4) डॉ. राजेंद्र प्रसाद

Who is the father of 'All India Services' ?

(1) Pandit Jawaharlal Nehru (2) Sardar Vallabhbhai Patel

(3) Dr. B.R. Ambedkar (4) Dr. Rajendra Prasad

---

8. कोणत्या संविधान संशोधन अधिनियमानुसार संसद एखाद्या राज्यामधे एका वर्षापेक्षा अधिक काळासाठी राष्ट्रपती शासन सुरु ठेवू शकतो ?

(1) 44 वा संविधान संशोधन अधिनियम 1978

(2) 48 वा संविधान संशोधन अधिनियम 1984

(3) 59 वा संविधान संशोधन अधिनियम 1988

(4) 62 वा संविधान संशोधन अधिनियम 1989

Under which Constitution Amendment Act the President can introduce President's rule for more than one year in a State ?

(1) $44^{th}$ Constitution Amendment Act, 1978

(2) $48^{th}$ Constitution Amendment Act, 1984

(3) $59^{th}$ Constitution Amendment Act, 1988

(4) $62^{nd}$ Constitution Amendment Act, 1989

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

9. खालीलपैकी कोणत्या मार्गदर्शक तत्त्वाचा समावेश 42 व्या घटनादुरुस्तीद्वारे झालेला **नाही** ?
(1) बालकांच्या निरोगी विकासासाठी संधी सुनिश्चित करणे.
(2) पर्यावरण सुधारणे व त्याचे संरक्षण करणे आणि वन व वन्यजीव यांचे संरक्षण करणे.
(3) उत्पन्न, दर्जा, सोयी-सवलती आणि संधी यातील विषमता कमी करणे.
(4) औद्योगिक व्यवस्थापनामध्ये कामगारांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करणे.
Which one of the following Directive Principles was **not** added through the 42nd Constitutional Amendment ?
(1) To secure opportunities for healthy development of children.
(2) To protect and improve the environment and to safeguard forests and wild life.
(3) To minimise inequalities in income, status, facilities and opportunities.
(4) To take steps to secure the participation of workers in the management of industries.

---

10. कोणत्या खटल्यात मा. सर्वोच्च न्यायालयाने 'मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे ही सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीला स्वयंसिद्ध करणारी व सुविधा पुरविणाऱ्या एकाच रथाची दोन चाके आहेत'. असा दृष्टिकोण स्विकारला होता ?
(1) गोलकनाथ खटला
(2) केशवानंद भारती खटला
(3) शंकरी प्रसाद वि. भारत सरकार
(4) जिलूभाई नानभाई खचर वि. गुजरात राज्य
In which case did the Honourable Supreme Court take the view that the 'Fundamental Rights and Directive Principles are the two wheels of the chariot as an aid to make social and economic democracy a truism' ?
(1) Golak Nath Case
(2) Keshavananda Bharati Case
(3) Shankari Prasad Vs Union of India
(4) Jilubhai Nanbhai Khachar Vs State of Gujarat

---

11. वित्त आयोगाबाबतचे **योग्य** विधाने :
(a) भारतीय आर्थिक संघराज्यवादाचे समतोल साध्य करण्यासाठीचे कार्य करणारे साधन.
(b) एक चेअरमन आणि इतर तीन सदस्यांचा समावेश असलेला आयोग.
(c) आयोगाच्या सदस्यांची पात्रता राष्ट्रपतींकडून ठरविली जाते.
(d) कलम 280 च्या तरतुदीनुसार निर्मिती.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (b), (c) आणि (d) (2) (b) आणि (c) (3) (a), (b) आणि (c) (4) (a) आणि (d)
The **correct** statements about Finance Commission :
(a) It is an act, as the balancing wheel of Indian fiscal federalism.
(b) It consists of a Chairman and three other members.
(c) Qualifications of the members of the Commission are determined by the President.
(d) It is constituted under the provision of article 280.
**Answer options :**
(1) (b), (c) and (d) (2) (b) and (c) (3) (a), (b) and (c) (4) (a) and (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

12. राज्य सूचीतील विषयासंबंधी केन्द्र सरकार विधिनियम करु शकते :

(1) जर संसदेने बहुमताने ठराव करुन जाहीर केले की राज्यसूचीतील विषय हा राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा असेल तर

(2) जर राज्यसभेने दोन तृतीयांश बहुमताने ठराव करुन जाहीर केले की राज्यसूचीतील विषय हा राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा असेल तर

(3) जर राष्ट्रपतीने आदेश दिला तर

(4) जर केन्द्रीय मंत्रीमंडळाने तसे करण्याचे ठरविले तर

The Central Government can legislate on subject of State list :

(1) If Parliament declares a state list subject to be a subject of national importance by majority vote.

(2) If Rajya Sabha declares a state subject to be a subject of national importance by 2/3 majority.

(3) If President issues an order.

(4) If Union Council of Ministers decided to do so.

---

13. लोकसभेत अविश्वास ठराव दाखल करण्यासाठी ________ सदस्यांच्या पाठिंब्याची गरज असते.

(1) 120 (2) 90 (3) 50 (4) 150

No-Confidence motion, to be admitted in the Lok Sabha, needs the support of ________ members.

(1) 120 (2) 90 (3) 50 (4) 150

---

14. खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य आणि त्याचे स्रोत हे जुळत **नाही** ?

(1) कायद्याचे अधिराज्य - ब्रिटिश राज्यघटना

(2) कायद्याने घालून दिलेली पद्धती - ब्रिटिश राज्यघटना

(3) कायद्याची योग्य पद्धती - अमेरीकन राज्यघटना

(4) न्यायालयीन पुनर्विलोकन - अमेरीकन राज्यघटना

Which of the following features and their source is **wrongly** matched ?

(1) Rule of Law - British Constitution

(2) Procedure Established by Law - British Constitution

(3) Due Process of Law - U.S. Constitution

(4) Judicial Review - U.S. Constitution

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

15. **विधान** (A) आणि **कारण** (R) **योग्य** पर्याय निवडा –

**विधान (A) :** भारतीय राज्यघटना अर्ध संघराज्यात्मक आहे.

**कारण (R) :** भारतीय राज्यघटनेने राज्य सरकारांपेक्षा केंद्र सरकारला अधिकचे अधिकार बहाल केले आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) **(A)** आणि **(R)** दोन्हीही विधाने बरोबर आहेत आणि **(R)** हे विधान **(A)** या विधानाचे योग्य स्पष्टीकरण आहे.

(2) **(A)** आणि **(R)** दोन्हीही विधाने बरोबर आहेत मात्र **(R)** हे विधान **(A)** या विधानाचे योग्य स्पष्टीकरण नाही.

(3) **(A)** हे विधान बरोबर आहे मात्र **(R)** हे विधान चुकीचे आहे.

(4) **(A)** हे विधान चुकीचे आहे परंतु **(R)** हे विधान बरोबर आहे.

**Assertion (A)** and **Reason (R).** Choose the **correct** option :

**Assertion (A) :** The Constitution of India is quasifederal.

**Reason (R) :** It has given more powers to the Central Government than to the State Governments.

**Answer options :**

(1) Both **(A)** and **(R)** are true and **(R)** is the correct explanation of **(A)**.

(2) Both **(A)** and **(R)** are true but **(R)** is not a correct explanation of **(A)**.

(3) **(A)** is true but **(R)** is false.

(4) **(A)** is false but **(R)** is true.

---

16. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात विकासाची प्रक्रिया गंभीरपणे अडचणीत आलेली होती कारण ________.

(1) शेतीच्या वृद्धीची प्रक्रिया मंद झालेली होती

(2) मोठी व्यापारी तूट

(3) निव्वळ बचतीचा दर वाढण्याऐवजी कमी झाला

(4) वरील सर्व

During the Third Five Year Plan period, the development process ran into serious difficulties because of ________.

(1) the process of agricultural growth had slowed down

(2) large trade deficit

(3) net saving rate, instead of rising further slumped down

(4) all the above

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

17. 12व्या पंचवार्षिक योजनेचा भर __________ वर होता.

(1) समावेशन म्हणजे गरीबी निर्मूलन

(2) समावेशन म्हणजे गटसमानता आणि प्रादेशिक समता

(3) उत्पन्नविषमतेवर प्रकाशझोत आणि समावेशन म्हणजेच सबलीकरण

(4) वरोल सर्व

12th Five Year Plan emphasises on __________.

(1) inclusiveness as poverty eradication

(2) inclusiveness as group equity and regional balance

(3) focus on income inequality and inclusiveness as empowerment

(4) all the above

---

18. जनता पक्षाने पुढीलपैकी कोणत्या कालावधीसाठी सहावी पंचवार्षिक योजना जाहीर केली ?

(1) 1980-85 (2) 1979-84 (3) 1978-83 (4) 1977-82

For which of the following period, VIth Five Year Plan was announced by Janata Party ?

(1) 1980-85 (2) 1979-84 (3) 1978-83 (4) 1977-82

---

19. चौथ्या पंचवार्षिक योजनेची पुढीलपैकी कोणती उद्दिष्ट्ये होती ?

(a) स्थैर्यासह वृद्धी (b) स्वावलंबन (c) सामाजिक न्याय

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (a) आणि (c)

(3) फक्त (b) आणि (c) (4) वरील सर्व

Which of the following were the objectives of IVth Five Year Plan ?

(a) Growth with stability (b) Self-reliance (c) Social Justice

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (a) and (c)

(3) Only (b) and (c) (4) All of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

20. __________ या योजनेमध्ये पहिल्यांदा समावेशन आणि शाश्वत विकास हे उद्दिष्ट विचारात घेण्यात आले.

(1) 10 वी पंचवार्षिक योजना (2) 11 वी पंचवार्षिक योजना

(3) 7 वी पंचवार्षिक योजना (4) 12 वी पंचवार्षिक योजना

__________ is the first plan which states the objectives of inclusiveness and sustainability of growth.

(1) $10^{th}$ Five Year Plan (2) $11^{th}$ Five Year Plan

(3) $7^{th}$ Five Year Plan (4) $12^{th}$ Five Year Plan

---

21. जगातील काही जुन्या मानवी हक्क संघटनांपैकी एक असलेल्या अँटी स्लेव्हरी इंटरनॅशनल या संघटनेची स्थापना 1839 साली __________ कार्यकर्त्यांनी केली.

(1) ब्रिटीश (2) बेल्जियन (3) दक्षिण आफ्रिकेतील (4) मेक्सिकोमधील

Anti-slavery International, one of the world's oldest international human rights organisation was founded in 1839 by __________ activists.

(1) British (2) Belgian (3) South African (4) Mexican

---

22. 24 ऑगस्ट 2018 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रकाशित केलेल्या 'अटलजी ने कहा' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत?

(1) ब्रिजेंद्र रेही (2) सुमित रावत

(3) रणवीर सिंह (4) विवेक कुमार सिंग

Who is the author of the book 'Atal Ji Ne Kaha' that was released by Prime Minister Narendra Modi on 24 August, 2018 ?

(1) Brijendra Rehi (2) Sumit Rawat

(3) Ranveer Sinha (4) Vivek Kumar Singh

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

23. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा समितीवर खालीलपैकी कोणत्या पाच देशांची पुढील दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी म्हणजेच 2019 आणि 2020 साठी अस्थायी सदस्य म्हणून निवड झाली आहे?

(1) इथिओपिया, इंडोनेशिया, पेरु, बेल्जियम आणि इटली
(2) दक्षिण आफ्रिका, कुवैत, जर्मनी, बोल्व्हिया आणि पोलंड
(3) कुवैत, इंडोनेशिया, डोमिनिकन रिपब्लिक, जर्मनी आणि स्वीडन
(4) दक्षिण आफ्रिका, बेल्जियम, जर्मनी, इंडोनेशिया आणि डोमिनिकन रिपब्लिक

Which of the following five countries are elected for the two years term i.e. 2019 and 2020 as a non-permanent members of UN Security Council ?

(1) Ethiopia, Indonesia, Peru, Belgium and Italy
(2) South Africa, Kuwait, Germany, Bolivia and Poland
(3) Kuwait, Indonesia, Dominican Republic, Germany and Sweden
(4) South Africa, Belgium, Germany, Indonesia and Dominican Republic

---

24. लहान आणि किरकोळ शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कोणत्या राज्य सरकार आणि भारत सरकारने जागतिक बँकेच्या आंतरराष्ट्रीय पुनर्निर्माण आणि विकास (IBRD) यांच्या बरोबर 420 दशलक्ष अमेरीकन डॉलर्स प्रकल्पाच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत?

(1) महाराष्ट्र (2) उत्तर प्रदेश (3) राजस्थान (4) मध्य प्रदेश

Which State Government and Government of India has signed agreement with World Bank's International Bank for Reconstruction and Development (IBRD) a US $ 420 million project to help small and marginal farmers ?

(1) Maharashtra (2) Uttar Pradesh (3) Rajasthan (4) Madhya Pradesh

---

25. ऑस्कर अवार्डस्-2018 (90 वी) विजेत्या बाबत खालीलपैकी कोणती जोडी **बरोबर नाही**?

(1) सर्वोत्कृष्ट अभिनेत्री - फ्रान्सेस मॅकडोरमंड
(2) सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री - ॲलिसन जानी
(3) सर्वोत्कृष्ट अभिनेता - गॅरी ओल्डमन
(4) सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता - वुडी हारेलसन

Which of the following pairs is **mismatched** about Oscar Award Winners-2018 ($90^{th}$) ?

(1) Best Actress - Frances McDormand
(2) Best Supporting Actress - Allison Janney
(3) Best Actor - Gary Oldman
(4) Best Supporting Actor - Woody Harrelson

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

26. अलिकडेच (सप्टेंबर 2018) हिमा दास यांची ________ च्या क्रीडा राजदूत म्हणून नियुक्ती करण्यात आली.

(1) आसाम (2) पश्चिम बंगाल (3) ओडिशा (4) झारखंड

Recently (September 2018) Hima Das was appointed as the sports ambassador of ________.

(1) Assam (2) West Bengal (3) Odisha (4) Jharkhand

27. 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' बाबत खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे?

(1) ही एक आंतरराष्ट्रीय अ-शासकीय संस्था असून तिची स्थापना 1995 साली झालेली आहे, जिचे मुख्यालय पॅरीस, फ्रान्स येथे आहे.

(2) ती भ्रष्टाचार आकलन निर्देशांक प्रकाशित करीत असते.

(3) 2017 च्या, निर्देशांकानुसार न्युझिलँड हा जगातील सर्वात किमान भ्रष्ट देश आहे.

(4) 2017 च्या जागतिक भ्रष्टाचार आकलन निर्देशांकानुसार भारताचे स्थान 81 वे आहे.

Which one of the following statements is **incorrect** about 'Transparency International' ?

(1) It is an international non-governmental organisation founded in 1995, which is based in Paris, France.

(2) It publishes the corruption perception index.

(3) As per index for 2017, New Zealand is the least corrupt country in the world.

(4) India ranked $81^{st}$ in the global corruption perceptions index 2017.

28. 'नारी शक्ती पुरस्कारा' बाबतीत खालील विधाने विचारात घ्या :

(a) त्याची स्थापना 2001 साली झाली.

(b) त्यास भारताचा महिलांसाठी असलेला सर्वोच्च नागरी सन्मान असे समजले जाते.

(c) तो प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने 8 मार्च रोजी राष्ट्रपतीद्वारे बहाल केला जातो.

वरीलपैकी कोणते विधान/ने **बरोबर** आहे/त?

(1) फक्त (a) (2) (a) आणि (b) (3) (b) आणि (c) (4) (a), (b) आणि (c)

Consider the following statements with regard to 'Nari Shakti Puraskar' :

(a) It was established in 2001.

(b) It is known as India's highest civilian honour for women.

(c) It is conferred by the President on the occasion of International Women's Day on March 8, every year.

Which of the statements given above is/are **correct** ?

(1) Only (a) (2) (a) and (b) (3) (b) and (c) (4) (a), (b) and (c)

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

29. म्यानमार आणि भारत सीमेवरील झोखावथार हे भू-इमिग्रेशन केंद्र ________ राज्यात आहे.

(1) मणिपूर (2) अरूणाचल प्रदेश
(3) मेघालय (4) मिझोराम

Zokhawthar land immigration centre between Myanmar and India border is in ________ state.

(1) Manipur (2) Arunachal Pradesh
(3) Meghalaya (4) Mizoram

---

30. पुढीलपैकी **योग्य** विधान शोधा.

(a) आशियाई खेळांचे नियंत्रण 'ऑलिंपिक कौन्सिल ऑफ एशिया' ही यंत्रणा करते.
(b) 2018 च्या आशियाई खेळात पहिल्यांदाच 'ब्रिज' हा पत्तांचा खेळ खेळण्यात आला.
(c) ब्रिज या खेळासाठी वयाची अट नाही.
(d) टोकियो येथील 2020 च्या ऑलिंपिक खेळामध्ये ब्रिज या पत्र्याच्या खेळीचा समावेश करण्यात येणार आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c), (d) (2) (b), (c), (d) (3) (a), (b), (c) (4) (c), (d)

Find out the **correct** statements from below.

(a) Olympic Council of Asia governs the Asian Games.
(b) The Bridge Card game is introduced for the first time in Asian Games 2018.
(c) There is no age limit for this bridge game.
(d) The Bridge Card game will be introduced at Tokyo Olympics 2020.

**Answer Options :**

(1) (a), (b), (c), (d) (2) (b), (c), (d) (3) (a), (b), (c) (4) (c), (d)

---

31. पुढे दिलेली विधाने विचारात घेऊन त्यांच्यावर आधारित सार्थ निष्कर्ष दिलेल्या पर्यायांतून निवडा.

ओळखता न येणाऱ्या उडत्या तबकड्या पाहिल्याचा दावा काहीजण करतात. अन्य तारकामंडळात जीवनाचे अस्तित्व असल्याची शक्यता विचारात घेतली जाते. आता अवकाश प्रवास प्रस्थापित झालेला आहे.

(1) अद्याप उडत्या तबकड्यांबाबतच्या माहितीचे दस्तावेजीकरण झालेले नाही.
(2) बुद्धिमान परग्रहवासीय पृथ्वीवर उडत्या तबकड्या पाठवतात.
(3) अन्य अवकाशस्थ घटकांवर रहाणाऱ्या काही प्रजातींनी प्रगत तंत्रज्ञान विकसित केलेले असून ते पृथ्वीवरील संत व्यक्तींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात.
(4) पृथ्वीप्रमाणेच उडत्या तबकड्या या अवकाशस्थ वस्तू आहेत.

Consider the following statements given below and select sensible conclusion based on this from the given options.

Some claim to have seen UFOs (unidentified flying object). Life on other galaxies is considered to be the possibility. Space travel is now an established fact.

(1) Information about UFO's is not yet documented.
(2) UFO's are sent on earth by intelligent extra-terrestrials.
(3) Some species living in other heavenly bodies have developed advanced technologies and are trying to communicate with saintly persons on the earth.
(4) UFO's are heavenly bodies like earth.

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

32. ज्यांच्यापैकी एक अपराधी आहे अशा चार संशयितांची पोलीसांकडून कसून चौकशी चालू आहे. जर फक्त एकच विधान सत्य असेल तर अपराधी निवडा.

**अनी :** ते दादूने केले.

**बनी :** ती मी नव्हे.

**दादू :** अनी माझ्यावर आरोप करत खोटं बोलतेय्.

**ईनी :** बनी खरं बोलतेय्.

**पर्यायी उत्तरे :**

(1) बनी (2) दादू (3) अनी (4) ईनी

Four suspects, one of them is the guilty party, are being interrogated by the police. Select the culprit if just only one of the statements is true.

**Ani :** Dadu did it.

**Bani :** It wasn't me.

**Dadu :** Ani is lying when he accuses me.

**Eni :** Bani is telling the truth.

**Answer Options :**

(1) Bani (2) Dadu (3) Ani (4) Eni

---

33. दोन घन, तुमच्यासमोर 'A' डावीकडे व 'B' उजवीकडे येईल, अशाप्रकारे एकमेकांच्या शेजारी ठेवले आहेत.

(a) 'A' या घनाच्या विरुद्ध पृष्ठांची एक जोडी लाल आहे तर दुसरी विरुद्ध पृष्ठांची जोडी निळी आहे. उरलेल्यांपैकी एक पृष्ठ पिवळे तर दुसरे जांभळे आहे.

(b) 'B' या घनाची फक्त एकच विरुद्ध पृष्ठ जोडी निळी आहे. उरलेल्या जोड्यांपैकी एका जोडीतील विरुद्ध पृष्ठांपैकी एक तपकीरी व एक हिरवे तर दुसऱ्या जोडीतील विरुद्ध पृष्ठांपैकी एक काळे तर दुसरे पांढरे आहे.

(c) जर 'A' चे लाल आणि 'B' चे निळे पृष्ठ टेबलाला स्पर्श करत असेल आणि 'A' चे पिवळे व 'B' चे काळे अशी पुष्ठे तुमच्या समोर असतील तर 'B' चे कोणत्या रंगाचे पृष्ठ 'A' च्या निळ्या पृष्ठासमोर येईल?

**पर्यायी उत्तरे :**

(1) तपकिरी (2) तपकिरी किंवा हिरवे

(3) पांढरे (4) पांढरे किंवा हिरवे

Two cubes are placed near to each other in front of you in such a way that 'A' is to your left and 'B' is to your right.

(a) One pair of opposite faces of cube 'A' is red and another pair of opposite faces is blue. One of the remaining faces is yellow and other one is violet.

(b) Only two opposite faces of cube 'B' are blue. One of the remaining pairs of opposite faces is brown and green and one of the other pair of opposite faces is black and white.

(c) If red surface of 'A' and blue of 'B' are touching the table and yellow of 'A' and black of 'B' are facing you, then which coloured side of 'B' is facing blue side of 'A' ?

**Answer options :**

(1) Brown (2) Either green or brown

(3) White (4) Either white or green

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

34. 'P', 'Q', 'R', 'S', 'T', 'U' आणि 'V' या सात व्यक्तींनी विविध रंगाचे शर्टस् परिधान केले आहेत - पांढरा, लाल, काळा, हिरवा, पिवळा, नीळा आणि जांभळा आणि विविध रंगाच्या विजारी परिधान केल्या आहेत नीळा, लाल, पांढरा, काळा, राखाडी, पिवळा आणि नारिंगी.

व्यक्तीच्या शर्टचे आणि विजारींचे वरील रंग हे एकाच क्रमाने (order) असणे आवश्यक नाही. कोणत्याही व्यक्तीने एकाच रंगाचे शर्ट आणि विजारी परिधान केलेल्या नाहीत.

'Q' ने लाल रंगाचा शर्ट परिधान केलेला असून त्याने करडा किंवा पिवळा रंग असलेल्या विजारी परिधान केल्या नाहीत. 'S' ने हिरव्या रंगाचा शर्ट आणि नारिंगी रंगाची विजार परिधान केली आहे. 'P' च्या शर्टचा आणि 'V' च्या विजारीचा रंग सारखाच आहे. 'T' चा शर्ट आणि 'R' ची विजार हे रंगाने सारखेच आहेत 'V' ने निळ्या रंगाचा शर्ट आणि 'T' ने निळ्या रंगाची विजार घातली आहे. 'U' ने कोणत्याही पिवळ्या रंगाचा पोषाख परिधान केला नाही. 'P' ने पांढरा शर्ट परिधान केला नाही. कोणत्याही व्यक्तीचा शर्ट आणि विजार यांची लाल व नीळा रंग अशी जोडी नाही. 'U' च्या शर्टचा रंग कोणता ?

(1) जांभळा (2) पांढरा (3) पांढरा किंवा जांभळा (4) माहिती पुरेशी नाही

'P', 'Q', 'R', 'S', 'T', 'U' and 'V' are the seven persons wearing a different colour shirts - white, red, black, green, yellow, blue and violet and different colour trousers - blue, red, white, black, grey, yellow and orange. The person's colour of the shirt and the colour of the trousers above are not necessarily in the same order. No person is wearing shirt and trousers of same colour.

'Q' is wearing red colour shirt and is not wearing grey or yellow colour trousers. 'S' is wearing green colour shirt and orange colour trousers. Colour of 'P's shirt and 'V's trousers is same. Colour of 'T's shirt and 'R's trousers is same. 'V' is wearing blue shirt and 'T' is wearing blue trousers. 'U' is not wearing any yellow dress. 'P' is not wearing a white shirt. Red and blue is not the combination of shirts and trousers of any of the persons. What is the colour of 'U's shirt ?

(1) Violet (2) White (3) White or Violet (4) Data inadequate

---

35. पुढे चार सत्य विधाने व त्यापुढे निष्कर्ष दिले आहेत. सार्थ निष्कर्ष निवडा.

सर्व HINS हे PINS आहेत.

काही SINS हे RINS आहेत.

सर्व ZINS हे SINS आहेत.

सर्व PINS हे ZINS आहेत.

(1) काही ZINS हे PINS आहेत. (2) सर्व ZINS हे RINS आहेत.

(3) सर्व RINS हे SINS आहेत. (4) सर्व HINS हे RINS आहेत.

Four true statements are given below and conclusions follow. Select the conclusion that makes sense.

All HINS are PINS

Some SINS are RINS

All ZINS are SINS

All PINS are ZINS

(1) Some ZINS are PINS (2) All ZINS are RINS

(3) All RINS are SINS (4) All HINS are RINS

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

36. 'चांगले' आणि 'वाईट' यासारख्या नैतिक दर्शकांची उपस्थिती तथ्यात्मक आशयात कोणतीही भर टाकत नाही. मी जर एखाद्याला, 'शिळी फळे चढ्या किमतीला विकणं हे तुझं वागणं वाईट आहे', असे सांगितले तर 'तू शिळी फळं चढ्या किमतीला विकली' असं थोडक्यात सांगण्यापलीकडे मी काहीही अधिकचं असं सांगत नसते. ही कृती वाईट आहे ही भर घालून मी त्याबद्दल अधिक काहीही विधान करत नाही. मी केवळ नैतिक नापसंती प्रकट करते. हे काहीसे मी 'तू शिळी फळं चढ्या किमतीला विकली' हे घृणा व्यक्त करणाऱ्या स्वरांत म्हटले किंवा ते लिहून त्यानंतर उद्गारचिन्ह लिहिल्यासारखे आहे. वाक्याच्या शब्दश: अर्थात, हा सूर वा उद्गारवाचक चिन्ह काहीही भर टाकत नाही. फक्त बोलणाऱ्या व्यक्तीने काही भावनांसह अभिव्यक्ती लक्षात घेतली आहे हे दाखवण्याचे काम यातून साधते.

पुढे दिलेल्यांतून वरील युक्तिवादाचा मुख्य निष्कर्ष उत्तम प्रकारे अभिव्यक्त करणारा पर्याय निवडा.

(1) काहीतरी चुकीचे आहे असे म्हणणे हा फक्त नापसंती व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे.

(2) जेव्हा कोणीतरी काहीतरी चुकीचं आहे असं प्रतिपादन करतात तेव्हा ते तथ्यांबाबत प्रतिपादन करतात.

(3) 'शिळी फळे चढ्या किमतीला विकणं हे तुझं वागणं वाईट आहे' चा अर्थ फक्त 'तू शिळी फळं चढ्या किमतीला विकली' एवढाच आहे.

(4) वाक्यातील चांगले वाईट या शब्दांची भर तथ्यात्मक आशयात बदल करत नाही.

The presence of an ethical indicator, such as 'right' and 'wrong', add nothing to its factual content. If I say to someone, "You acted wrongly in selling stale fruits at exorbitant price', I am not stating anything more than if I simply said, 'You sold stale fruits at exorbitant price'. In adding that this action is wrong I am not making any further statement about it. I am simply evincing moral disapproval. It is as if I had said, 'You sold stale fruits at exorbitant price' in a tone of horror, or written it with exclamation marks after it. The tone or exclamation mark adds nothing to the literal meaning of the sentence. It merely serves to show that the expression is attended by certain feelings in speaker.

Select from following options that best expresses the main conclusion of the above argument.

(1) Saying that something is wrong is just a way of showing disapproval.

(2) When somebody states that something is wrong, they are making statement of facts.

(3) 'You acted wrongly in selling stale fruits at exorbitant price', just means 'You sold stale fruits at exorbitant price'.

(4) Adding to a statement the words 'right' or 'wrong' does not alter its factual content.

---

37. काली, ऑर्थर, हेमा, फातिमा आणि लेना पाच सुगाव्यांच्या मदतीने खजिना शोध घेत आहेत. कालीला सर्व सुगावे लागले पण तिने शोध सर्वात शेवटी संपवला. लेना दुसऱ्या क्रमांकाला परतली पण तिचे दोन सुगावे चुकले. लेनापेक्षा हेमाचे दोन जास्त प्रश्न बरोबर होते पण तिने लेनाच्या नंतर शोध संपवला. ऑर्थर लेनापेक्षा अधिक वेगात नव्हता. फातिमा हेमापेक्षा अधिक वेगात होती आणि तिचा फक्त एकच प्रश्न चुकला.

जर वरील माहिती सत्य असेल तर पुढीलपैकी सत्य असणे शक्य नाही असे फक्त एक विधान निवडा.

(1) फातिमा सर्वप्रथम आली (2) हेमा कालीपेक्षा वेगवान होती

(3) फातिमा ऑर्थरपेक्षा वेगवान होती (4) लेना तिसरी आली

Kali, Arthur, Hema, Fatima and Lena do a treasure hunt with five clues to find. Kali got all the clues right but finished last. Lena got back second, but got two clues wrong. Hema got two more questions right than Lena, but finished after her. Arthur wasn't faster than Lena. Fatima was faster than Hema, and only got one question wrong.

If these statements are true, select only one of the sentences given below that cannot be true.


(1) Fatima got back first (2) Hema was faster than Kali

(3) Fatima was faster than Arthur (4) Lena came third

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

38. पुढे दिलेल्या साध्या व सातत्यपूर्ण प्रतिमा मालिकेच्या पाचव्या जागेसाठी तर्कदृष्ट्या उचित प्रतिमा निवडा.




(1) 

(2) 

(3) 

(4) 

Select logically appropriate image for the fifth place of simple and continuous series of images given below :



(1) 

(2) 

(3) 

(4) 

39. अनेक लोक, त्यांच्या वडीलधाऱ्यांनी ज्याला अनैतिक वर्तन मानले त्याच्या आधारे ज्यांना ते तरुणाई म्हणून संबोधतात, त्यांच्यावर टीका करतात. जग बदलले आहे व त्याबरोबरीने नैतिक मानकेही बदलली आहेत हे वास्तव या टीकाकारांनी लक्षात घ्यायला हवे. तंत्रज्ञान वेगाने प्रगती होत आहे आणि केवळ त्या जगात वावरणाऱ्या तरुणांनाच त्याचे आकलन होऊ शकते. म्हणूनच त्यांच्या आई-वडीलांनी किंवा आजी-आजोबांनी नव्हेत तर त्यांनी स्वत:च नैतिक मानके निश्चित केली पाहिजेत. 25 वर्षांवरील कोणीही नाही म्हटले तरी स्वत:च्या भूतकाळात शिकलेल्या गोष्टींमुळे झापडबंद झालेले असणारच. त्यांच्या शिक्षणाने त्यांना आधुनिक जगासंबंधीचा दृष्टिकोन प्राप्त करण्यापासून व त्याला मागणीनुसार प्रतिसाद देण्यापासून प्रतिबंधित केले आहे म्हणूनच त्यांच्या नैतिक निवाड्यांना काहीही अर्थ उरलेला नाही.

वरील युक्तिवादाचा सर्वात योग्य मुख्य निष्कर्ष अभिव्यक्त करणारे विधान निवडा.

(1) 25 वर्षांवरील व्यक्तींनी केलेल नैतिक निवाडे निरर्थक आहेत.

(2) 25 वर्षांखालील लोकांनी नैतिक मानके निश्चित करायला हवीत.

(3) ज्याला ज्येष्ठ अनैतिक वर्तन मानतात तो प्रमाद तरुण पिढीकडून घडला आहे.

(4) फक्त तरुणांनाच वर्तमानकालीन जगाचे आकलन आहे.

Many people criticise what they call 'the younger generation' for what their seniors regard as immoral behaviour. These critics need to realise that because the world has changed, moral standards have changed with it. In fact, technology is advancing so rapidly that it is only the young who understand the world in which they live. It is they, not their parents or grandparents, who should be setting moral standards. Anyone over the age of 25 cannot help but be blinded by what they learned in the past. Their education has prevented them from perceiving and responding to the demands of the modern day, and so their moral judgements have no validity.

Select one of the following that best expresses the main conclusion of the above argument.

(1) Moral judgements made by people over the age of 25 are not valid.

(2) Moral standards should be set by people under the age of 25.

(3) The younger generation is guilty of what older people regard as immoral behaviour.

(4) Young people are the only ones who understand the contemporary world.

40. ईटमला जायचा रस्ता विचारण्यासाठी दामू, अयना या गावात थांबला. स्थानिकांकडून त्याला पुढील माहिती मिळाली. अयना बोरीच्या पूर्वेला आहे. ईटम कुर्डेच्या उत्तरेला आहे. डोंगे अयनाच्या दक्षिणेला आहे. कुर्डे डोंगेच्या पश्चिमेला आहे. पूर्वेला म्हणजे नेमके पूर्वेच्या जास्तीत जास्त जवळपास असे गृहीत धरा. या माहितीनुसार पुढीलपैकी दामूला खात्रीने म्हणता येईल असे एक विधान निवडा.

(1) मला नेमके पश्चिमेला जाणे गरजेचे आहे.

(2) मला नेमके पश्चिमेला जाणे गरजेचे आहे पण ते कदाचित वायव्येला किंवा नैऋत्येलाही असेल.

(3) मला नेमके वायव्येला जाणे गरजेचे आहे.

(4) मला नेमके उत्तरेला जाणे गरजेचे आहे पण कदाचित ते जरासे पश्चिमेलाही असेल.

Damu stopped in a village called Aina, to ask the way to Etum. He got following information from locals. Aina is to the east of Bori. Etum is to the north of Kurde. Donge is to the south of Aina. Kurde is to the west of Donge. Assuming that east means, as near as it matters, "due east", select the one of the following that can be said by Damu with certainty.

(1) I need to go due west

(2) I need to go to the west but it may be north-west or south-west

(3) I need to go to north-west

(4) I need to go to north but it may also be a bit west

---

41. बोट X व Y या बंदरांदरम्यान प्रवास करताना 1 तास 15 मिनिटे सागरावर प्रवास करते आणि दोन्हीपैकी प्रत्येक धक्क्यावर 30 मिनिटे थांबते. याच दोन बंदरांदरम्यान सेवा देत असलेल्या हॉवरक्राफ्टला फक्त 45 मिनिटे पुरतात आणि परतण्यापूर्वी ते 15 मिनिटे धक्क्यावर थांबते. जर दोन्ही वाहने सकाळी 07 : 30 ला X बंदर सोडत असतील तर पुढीलपैकी **असत्य** विधान निवडा :

(1) हॉवरक्राफ्टच्या पाठोपाठच्या दोन प्रस्थानांदरम्यान नेमका एका तासाचा कालावधी आहे.

(2) 12.15 वाजता बोट व हॉवरक्राफ्ट ही दोन्ही वाहने Y बंदरात असतील.

(3) बोटीच्या पाठोपाठच्या दोन प्रस्थानांदरम्यान नेमका तीन तासांचा कालावधी आहे.

(4) जेव्हा हॉवरक्राफ्ट तिसऱ्या वेळी Y बंदरात परतेल तेव्हा बोटही तेथे परतेल.

The ferry operating between ports X and Y is at sea for 1 hour and 15 minutes and is at its berth at either end for 30 minutes. The hovercraft service between two ports takes only 45 minutes and is berthed for 15 minutes before returning. If they both leave port X at 07 : 30 am, select **false** statement from the following :

(1) There is exactly one hour between two successive departures of the hovercraft.

(2) At 12.15 ferry and hovercraft both are at Y.

(3) There is exactly three hours duration between two successive departures of the ferry.

(4) When hovercraft returns for third time at port Y boat will also returns there.

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

**42.** नव्या घरगुती अंदाजपत्रकात पेट्रोलची किंमत 10% वाढली तर खर्चात वाढ होऊ नये यासाठी त्याच्या वापरात करायच्या कपातीची टक्केवारी निवडा.

(1) 10% (2) $6\frac{1}{9}\%$ (3) $6\frac{1}{4}\%$ (4) $9\frac{1}{11}\%$

In the new domestic budget, the price of a petrol rose by 10%, select the percentage by which one must reduce the consumption so that the expenditure does not increase.

(1) 10% (2) $6\frac{1}{9}\%$ (3) $6\frac{1}{4}\%$ (4) $9\frac{1}{11}\%$

---


**43.** ताशी 10 कि.मी. गती असलेली पोलिस व्यक्ती ताशी 8 कि.मी. गतीने धावणाऱ्या चोराचा पाठलाग करत आहे. जर चोर पोलिसाच्या 100 मीटर पुढे असेल तर चोराला पकडण्यासाठी पोलिसाला लागणारा वेळ असेल :

(1) 2 मिनिटे (2) 3 मिनिटे (3) 4 मिनिटे (4) 6 मिनिटे

A thief running at 8 km/hr is chased by police person who's speed is 10 km/hr. If the thief is 100 m ahead of the policeman, then the time required for the policeman to catch the thief will be :

(1) 2 minutes (2) 3 minutes (3) 4 minutes (4) 6 minutes


---

**44.** 

नृत्य सरावासाठी सिल्व्हियाला सकाळी 7 : 00 वाजता उठायचे होते. उठल्यानंतर तिने तिच्या अंकीय घड्याळाकडे पाहिले. विद्युतघटाचा भार कमी झाल्यामुळे तिला तास व मिनिटांची सोबतची मांडणी पाहण्यास मिळाली.

तिने खिडकीतून बाहेरचा उजेड पाहिला आणि सकाळी सात वाजल्यानंतर बारा तासांचा उशीर झाला नसल्याची तिला खात्री पटली. तिला उठायला जास्तीत जास्त किती उशीर झाला असावा हे दाखवणारा पर्याय निवडा.

(1) 1 : 59 (2) 2 : 35 (3) 2 : 59 (4) 1 : 39



Sylvia wanted to wake up at seven O'clock in the morning for dance practice. After waking up she looked at her digital clock. She saw accompanying display of hours and minutes as a result of lowering of batteries.

She saw light outside the window so she was sure that she cannot be more than twelve hours late after seven O'clock in the morning. Select greatest amount of time that she could be late in waking up.

(1) 1 : 59 (2) 2 : 35 (3) 2 : 59 (4) 1 : 39

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

**45.** या वर्षी प्रथमच माझ्या नव्या आंब्याच्या झाडावर 96 फळे धरली. हा आनंद साजरा करण्यासाठी गावच्या प्रथेप्रमाणे पाच फळे पाखरांसाठी झाडावर ठेवून यातील बहुतेक माझ्या काही शेजाऱ्यांना द्यायचे आहेत. माझे कुटुंब धरून सर्व शेजाऱ्यांना समान संख्येने आंबे मिळायला हवेत आणि ते जास्तीत शेजाऱ्यांना मिळावेत अशी माझी इच्छा आहे. प्रत्येक शेजाऱ्याला किमान पाच तरी आंबे मिळायला हवेत.

आंब्यांची पिशवी मिळणार आहे अशा शेजाऱ्यांची आणि प्रत्येक पिशवीत असलेल्या आंब्यांची अनुक्रमे संख्या निवडा :

(1) वाटण्यासाठी उपलब्ध असलेल्या फळांची संख्या विषम असल्यामुळे आंब्यांच समान वाटप करणे कठीण आहे.

(2) 12 आणि 7.

(3) 13 आणि 7.

(4) 7 आणि 13.

This year my new mango tree had 96 fruits for the first time. To celebrate this joy I wish to hand out most of these to some of my neighbours as per our village tradition by leaving five fruits on the tree for birds. All neighbours including my family must get the same number of mangoes and I wish to give these to as many neighbours as possible. Each neighbour should get at least five mangoes.

Select the number of neighbours that would receive a bag of mangoes and number of mangoes that each bag contains respectively.

(1) It is difficult to distribute mangoes equally as number of fruits available distribution is odd.

(2) 12 and 7.

(3) 13 and 7.

(4) 7 and 13.

---

**46.** सोपे रूप द्या :

$$10 - \cfrac{19}{1 + \cfrac{5}{1 + \cfrac{5}{15}}}$$

(1) 6 (2) 10 (3) 8 (4) 144

Simplify :

$$10 - \cfrac{19}{1 + \cfrac{5}{1 + \cfrac{5}{15}}}$$

(1) 6 (2) 10 (3) 8 (4) 144

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK


47. ऑलिंपियाड समीकरण सोडवायला मिलोला 2 मिनिटे व 38 सेकंद लागतात. जिलो तेच गणित दुप्पट वेगाने करतो. गुलोला तेच सोडवायला जिलोपेक्षा 47 सेकंद जास्त लागतात. गुलोला लागणारा वेळ निवडा.

(1) 6 मिनिटे; 3 सेकंद (2) 2 मिनिटे; 6 सेकंद
(3) 3 मिनिटे; 25 सेकंद (4) 5 मिनिटे; 3 सेकंद

Milo solves an Olympiad equation in 2 minutes 38 seconds. Jilo does it twice as fast. Gulo needs 47 seconds more than Jilo. Select the time that Gulo needs.

(1) 6 minutes; 3 seconds (2) 2 minutes; 6 seconds
(3) 3 minutes; 25 seconds (4) 5 minutes; 3 seconds


48.




AB = 40 मी. आणि BC = 30 मी. या मापाचे चौकोनी खेळ मैदान आहे. शारीरिक शिक्षण संचालकांनी सॅम आणि जगला जांभया देताना पाहिले. त्यांनी सॅमला मैदानाभोवती ABCDA अशा दोन फेऱ्या आणि जगला AM, MN, NC, CP, PQ आणि A पर्यंत दोन फेऱ्या मारायला सांगितले. MN व PQ हे परस्परांना लंब असलेल्या आणि अनुक्रमे BC व CD यांना समांतर असलेल्या मैदानाच्या सीमेला स्पर्श करणाऱ्या पायवाटा आहेत. (आवश्यक असल्यास सोबतची आकृती अभ्यासा.)

दिलेल्या माहितीच्या संदर्भात **योग्य** पर्याय निवडा.

(1) सॅम जगपेक्षा अधिक अंतर चालला.
(2) जग सॅमपेक्षा अधिक अंतर चालला.
(3) जग आणि सॅम समान अंतर चालले.
(4) जग सॅमने पार केलेल्या अंतराच्या $\frac{1}{7}$ अंतर अधिक चालला.




There is a rectangular playground with AB = 40 m and BC = 30 m. The physical director saw Sam and Jag yawning. He asked Sam to go round the playground ABCDA twice and Jag to go along AM, MN, NC, CP, PQ and to A twice. MN and PQ are walking tracks perpendicular to each other and parallel to sides BC and CD respectively and touch the boundary of playground. (Study accompanying figure if necessary.)

Select the **correct** option with respect to given information.

(1) Sam covered more distance than Jag.
(2) Jag covered more distance than Sam.
(3) Jag and Sam covered equal distances.
(4) Jag covered $\frac{1}{7}^{th}$ more distance than that covered by Sam.

49. X व Y या दोन संख्या Z या तिसऱ्या संख्येपेक्षा अनुक्रमे 20% आणि 28% कमी आहेत. तर Y ही संख्या X पेक्षा किती टक्के लहान आहे ?

(1) 8% (2) 10% (3) 24% (4) 48%

Two numbers X and Y are respectively 20% and 28% less than the third number Z. By what percentage is the number Y less than the number X ?

(1) 8% (2) 10% (3) 24% (4) 48%

---

50. वेदांतचे वय हे सुशांतच्या वयाच्या एकतृतीयांश आहे. हीनाचे वय सुशांतपेक्षा निम्मे असून बीनाचे वय हे हीनाच्या वयाच्या दिडपट आहे. निशांतचे वय चोवीस वर्षे असून तो बीनापेक्षा बारा वर्षांनी लहान आहे, तर वेदांतचे वय किती ?

(1) 24 वर्षे (2) 32 वर्षे (3) 12 वर्षे (4) 16 वर्षे

Age of Vedant is one-third times of Sushant, Heena's age is half of Sushant and Beena's age is one and half times of the Heena's age. Nishant is twenty four years old, he is younger than Beena by twelve years. Then what is age of Vedant ?

(1) 24 years (2) 32 years (3) 12 years (4) 16 years

---

51. एका आयताकृती पटांगणाची लांबी व रुंदी 3 : 2 या गुणोत्तरात आहे. एक सायकलस्वार ताशी 12 कि.मी. वेगाने या पटांगणाची एक फेरी 8 मिनिटात पूर्ण करतो. तर त्या पटांगणाचे क्षेत्रफळ किती ?

(1) 15360 चौ.मी. (2) 153600 चौ.मी. (3) 30720 चौ.मी. (4) 307200 चौ.मी.

The ratio between the length and the breadth of a rectangular park is 3 : 2. If a man cycling along the boundary of the park at a speed of 12 km/hr completes one round in 8 minutes, then what is the area of the park ?

(1) 15360 sq.m. (2) 153600 sq.m. (3) 30720 sq.m. (4) 307200 sq.m.

---

52. एका दूरदर्शन संचाची दर्शनी किंमत ₹ 47,500 असून विक्रीची किंमत ₹ 43,700 आहे. तर शेकडा सूट काढा.

(1) 38% (2) 8% (3) 9% (4) 8.5%

A television set marked at ₹ 47,500 was sold for ₹ 43,700. Find the rate of discount.

(1) 38% (2) 8% (3) 9% (4) 8.5%

---

53. एका दुकानदाराने 100 छत्र्या ₹ 80 एक याप्रमाणे विकत घेतल्या व त्याची छापील किंमत ₹ 100 एक याप्रमाणे ठेवली. त्याने 60 छत्र्या छापील किंमतीस व उरलेल्या छत्र्या 10% सूट छापील किमतीवर याप्रमाणे विकल्या. तर त्या दुकानदारास शेकडा किती नफा झाला ?

(1) 15% (2) 25% (3) 20% (4) 10%

A shopkeeper purchased 100 umbrellas at ₹ 80 each and marked them at ₹ 100 each. He sold 60 umbrellas at the market price and remaining by providing 10% discount on market price. Find the net percentage profit earned by him.

(1) 15% (2) 25% (3) 20% (4) 10%

---

54. 90 ते 180 अंकांची सरासरी ही 80 ते 160 अंकांच्या सरासरीपेक्षा कितीने जास्त आहे ?

(1) 80 (2) 20 (3) 15 (4) 90

How much more is the average of numbers from 90 to 180 than average of numbers from 80 to 160 ?

(1) 80 (2) 20 (3) 15 (4) 90

---

55. खालील राशीची किंमत काढा :

$$\frac{(0.96)^3 - (0.1)^3}{(0.96)^2 + 0.096 + (0.1)^2}$$

(1) 0.86 (2) 0.95 (3) 0.97 (4) 1.06

Find the value of :

$$\frac{(0.96)^3 - (0.1)^3}{(0.96)^2 + 0.096 + (0.1)^2}$$

(1) 0.86 (2) 0.95 (3) 0.97 (4) 1.06

---

56. एका संख्येच्या वर्गात त्या संख्येच्या $\frac{1}{4}$ भाग मिळविल्यास 17 संख्या येते. तर ती संख्या कोणती ?

(1) 5 (2) 7 (3) 4 (4) 9

A sum of square of number and its $\frac{1}{4}^{th}$ part is 17. What is a number ?

(1) 5 (2) 7 (3) 4 (4) 9

---

57. एक संख्या 4 ने वाढविल्यास तो 4, 12, 34, 51 या संख्यांचा ल.सा.वि. आहे तर ती संख्या कोणती ?

(1) 136 (2) 170 (3) 154 (4) 200

A number when increased by 4 it becomes the LCM of 4, 12, 34, 51, find that number.

(1) 136 (2) 170 (3) 154 (4) 200

---

58. एका अपूर्णांकाचा छेद त्याच्या अंशापेक्षा 4 ने मोठा आहे. त्या अपूर्णांकाच्या अंशामध्ये 11 मिळवले व छेदातून 1 वजा केल्यास मिळणाऱ्या अपूर्णांकाची किंमत $\frac{7}{3}$ होते, तर मूळचा अपूर्णांक कोणता ?

(1) $\frac{5}{9}$ (2) $\frac{1}{5}$ (3) $\frac{3}{7}$ (4) यापैकी नाही

The denominator of a fraction is greater than the numerator by 4. If 11 is added to the numerator and 1 is subtracted from the denominator, the value of the fraction obtained is $\frac{7}{3}$. Then what is the original fraction ?

(1) $\frac{5}{9}$ (2) $\frac{1}{5}$ (3) $\frac{3}{7}$ (4) None of these

---

59. p आणि q व्यस्त चलनात आहेत. जेव्हा $p = 7$ तेव्हा $q = 13$ असतात जर $p = 14$ असेल तर q ची किंमत काढा.

(1) 98 (2) $\frac{13}{2}$ (3) $\frac{7}{13}$ (4) 26

p and q are inversely proportional when $p = 7$ then $q = 13$, so when $p = 14$, find the value of q.

(1) 98 (2) $\frac{13}{2}$ (3) $\frac{7}{13}$ (4) 26

---

**60.** जर $484 \times 144 = 69696$, तर $\sqrt{\frac{69.696}{14.4}} = ?$

(1) 48.4 (2) 4.84 (3) 2.22 (4) 2.2

If $484 \times 144 = 69696$, then $\sqrt{\frac{69.696}{14.4}} = ?$

(1) 48.4 (2) 4.84 (3) 2.22 (4) 2.2

---

**61.** थकबाकीचा खर्च हा एक ________ घटक आहे.

(1) मालमत्ता (2) देणी

(3) व्यापारी खात्याच्या नावे बाजूस (4) व्यापारी खात्याच्या जमा बाजूस

Outstanding expenses is an item of ________.

(1) assets (2) liabilities

(3) trading account debit side (4) trading account credit side

---

**62.** घसारा हा ________ करीता आकारला जातो.

(1) खरा नफा किंवा तोटा शोधणे

(2) मालमत्तेची कार्यक्षमता टिकविणे

(3) मालमत्तेचे मूल्यांकन करणे

(4) यापैकी काही नाही

Depreciation is charged to ________ .

(1) Ascertain true Profit or Loss

(2) Maintenance of asset in a state of efficiency

(3) Valuation of asset

(4) None of these

---

**63.** फर्निचरच्या खरेदीवरील दिलेले वाहतूक भाडे ₹ 2000 ________ ला आकारले जाते.

(1) व्यापारी लेखा (2) नफा आणि तोटा लेखा

(3) फर्निचर लेखा (4) घसारा लेखा

Freight of ₹ 2000 paid on the purchase of Furniture charged to ________ Account.

(1) Trading Account (2) Profit and Loss Account

(3) Furniture Account (4) Depreciation Account

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

64. ऱ्हासमान शेष पद्धतीच्या बाबतीत __________ वर घसारा आकारला जातो.

(1) मालमत्तेच्या मूळ परिव्ययावर
(2) मालमत्तेच्या पुस्तकी मूल्यावर
(3) मालमत्तेच्या बाजारपेठ मूल्यावर
(4) पुस्तकी मूल्य किंवा बाजारपेठ मूल्य यापैकी कमी असणाऱ्या मालमत्तेच्या मूल्यावर

In case of Diminishing Balance Method the Depreciation is charged on __________.

(1) Original cost of assets
(2) Book value of the assets
(3) Market value of the assets
(4) Book value or market value whichever is less value of Assets

---

65. जर अखेरचा शिल्लक माल तेरीज पत्रक मध्ये दाखविण्यात येत आहे तर, त्याची नोंद __________ होत आहे.

(1) व्यापारी खाते (2) नफा व तोटा खाते
(3) ताळेबंद (4) व्यापारी खाते व ताळेबंद

If the closing stock is appearing in the Trial Balance it is shown in the __________ .

(1) trading account (2) profit and loss account
(3) balance sheet (4) trading account and balance sheet

---

66. प्रवेश शुल्क सर्वसाधारणपणे __________ करिता आहे.

(1) भांडवलीकरण (2) उत्पन्न सारखे/म्हणून घेणे
(3) देणी सारखे समजणे (4) खर्चासारखे घेणे

Entrance fees are generally __________.

(1) capitalised (2) taken as income
(3) treated as a liability (4) taken as expenses

---

67. __________ च्या वर्षअखेरची शिल्लक ही रोकड रक्कम किंवा रोकड पेक्षा जास्त खर्च दर्शविते.

(1) जमा आणि खर्च खाते (2) आय आणि व्यय खाते
(3) नफा आणि तोटा खाते (4) यापैकी काही नाही

Balance at the year end of __________ represents cash in hand or cash overspent.

(1) Receipt and Payment Account (2) Income and Expenditure Account
(3) Profit and Loss Account (4) None of these

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

68. तेरीज पत्रक तयार करण्याचे मुख्य हेतू खालील प्रमाणे आहेत.

(a) सर्व खतावणी खात्यांच्या शिलकासाठी

(b) प्रत्येक व्यवहाराच्या एका नोंदीच्या पुराव्यासाठी

(c) लेखा पुस्तकाच्या गणितीय अचुकतेसाठी

(d) अंतिम लेखे तयार करण्यासाठी

वरीलपैकी कोणते विधाने **बरोबर** आहेत ?

(1) (a) आणि (b) फक्त (2) (a) आणि (c) फक्त

(3) (a), (c) आणि (d) फक्त (4) (a), (b) आणि (d) फक्त

Following are the main objectives of preparation of Trial Balance.

(a) To have balances of all ledger accounts

(b) To have a proof of single entry of each transaction

(c) To have arithmetic accuracy of the books of account

(d) To have material for preparing final Accounts

Which of the statements given above are **correct** ?

(1) (a) and (b) only (2) (a) and (c) only

(3) (a), (c) and (d) only (4) (a), (b) and (d) only

---

69. खात्याच्या दोन्ही बाजूच्या बेरजा समान करण्यासाठी, जर खात्याच्या नावे बाजूची बेरीज जमा बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असेल तर त्या फरकास ________ म्हणतात.

(1) नावे बाकी (2) जमा बाकी (3) निरंक बाकी (4) चालू बाकी

While balancing the Account, if the total of Debit side is greater than the total of credit side, the difference is known as :

(1) Debit Balance (2) Credit Balance (3) Nil Balance (4) Current Balance

---

70. किरकोळ रोकड किर्द सहसा ________ च्या धर्तीवर बनविले जाते.

(1) एकेरी स्तंभ रोकड किर्द (2) अग्रधन प्रणाली

(3) दुहेरी नोंद प्रणाली (4) दुहेरी स्तंभ रोकड किर्द

The Petty Cash Book is usually maintained on the basis of ________ .

(1) Single Column Cash book (2) Imprest System

(3) Double Entry System (4) Double Column Cash Book

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

71. बँक जुळवणी पत्रकाचा खालील प्रमाणे तपशिल दिला आहे.

| | | |
|---|---|---|
| (a) | रोकड किर्द प्रमाणे शिल्लक | ₹ 5,80,000 |
| (b) | दिलेला पण वट विधान न आलेला धनादेश | ₹ 2,00,000 |
| (c) | वसुलीसाठी जमा केलेला परंतु रक्कम वसूल न झालेला धनादेश | ₹ 1,50,000 |
| (d) | बँकेने चूकीने संस्थेच्या खात्यास नावे बाजूस टाकलेल्याची दूरुस्ती केली | ₹ 20,000 |

ग्राहक पुस्तिके प्रामाणे (पासबुका प्रमाणे) शिल्लक किती असेल?

(1) ₹ 6,50,000 (2) ₹ 5,50,000 (3) ₹ 5,10,000 (4) ₹ 6,10,000

Following are the particulars of Bank Reconciliation statement given.

| | | |
|---|---|---|
| (a) | Balance as per Cash Book | ₹ 5,80,000 |
| (b) | Cheque issued but not presented for payment | ₹ 2,00,000 |
| (c) | Cheque sent for collection but not collected | ₹ 1,50,000 |
| (d) | The Bank had wrongly debited the account of the firm by ₹ 20,000 which was rectified | |

What is the Balance as per Bank Passbook ?

(1) ₹ 6,50,000 (2) ₹ 5,50,000 (3) ₹ 5,10,000 (4) ₹ 6,10,000

---

72. एका संस्थेने ₹ 3,90,000 किंमतीस एक यंत्र खरेदी केले. यंत्राचे उपयुक्त आयुर्मान चार वर्षे आहे. आणि अखेरीस त्याचे अवशिष्ट मूल्य ₹ 40,000 आहे.

स्थिर प्रभाग पद्धतीने घसाऱ्याची तरतूद केली आहे.

यंत्राचे दोन वर्षानंतरचे निव्वळ पुस्तकी मूल्य __________ राहिल.

(1) ₹ 2,15,000 (2) ₹ 1,95,000 (3) ₹ 1,75,000 (4) ₹ 3,02,500

A firm purchased a machine - for ₹ 3,90,000. The useful life of machine is four years and its residual value is ₹ 40,000 at the end of the mentioned period.

Depreciation is to be provided on straight line method.

The net book value of machine after two years is __________.

(1) ₹ 2,15,000 (2) ₹ 1,95,000 (3) ₹ 1,75,000 (4) ₹ 3,02,500

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

73. विशेष हेतुकरिता मिळालेली देणगी __________ कडे घेतली जाईल.

(1) उत्पन्न व खर्च खाते

(2) ताळे बंदाच्या मालमत्ते बाजूस

(3) ताळे बंदाच्या देणीच्या बाजूस

(4) नफा व तोटा खाते

Donation received for a special purpose will be taken to the __________ .

(1) Income and Expenditure Account

(2) Assets side of the Balance sheet

(3) Liabilities side of the Balance sheet

(4) Profit and Loss Account

---

74. खालीलपैकी कोणत्या व्यवहाराची नोंद ही जमा आणि खर्च लेख्यामध्ये करता येणार नाही ?

(a) जुन्या फर्निचरची विक्री (b) जुन्या फर्निचरच्या विक्रीवरील तोटा

(c) आरंभीची रोख शिल्लक (d) आगाऊ मिळालेले सदस्यत्व शुल्क

वरीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहेत ?

(1) (a) फक्त (2) (b) फक्त

(3) (a) आणि (b) फक्त (4) (a), (c) आणि (d) फक्त

Which of the following item should not be entered in Receipts and Payments Account ?

(a) Sale of old furniture (b) Loss on sale of old furniture

(c) Opening Cash Balance (d) Membership fee received in advance

Which of the statement given above is/are **correct** ?

(1) (a) Only (2) (b) Only

(3) (a) and (b) Only (4) (a), (c) and (d) Only

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

75. मालमत्तेवर घसारा आकारण्याचे कारण/कारणे खालील आहेत.

(a) मालमत्तेच्या उपयोगितेच्या वापरामुळे होणारा तोटा

(b) मालमत्तेचा वापर न केल्यामूळे किंमतीत घट होते

(c) तांत्रिक विकासामूळे जूनी मालमत्ता कालबाह्य होते

(d) मालमत्ता सततच्या कामामुळे पूर्णपणे उपयोगात आणली जाते

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त (2) (b) आणि (c) फक्त

(3) (d) फक्त (4) (a), (b), (c) आणि (d)

Following is/are cause/causes of Depreciation charged on Assets.

(a) The loss of utility of an assets due to its use

(b) An Assets is not used its value falls over a period of time

(c) Due to technological development old assets become outdated

(d) An asset may get exhausted through constant working.

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) and (c) only

(3) (d) only (4) (a), (b), (c) and (d)

---

76. 31 मार्च, 2000 अखेरच्या लेखावर्ती-वर्षा दरम्यान 30 जुन, 2000 पर्यंतचे भाडे दिले आहे. एप्रिल ते जुन या कालावधीतील भाड्याची नोंद _________ म्हणून केली जाईल.

(1) थकबाकी खर्च (2) थकबाकी उत्पन्न

(3) आगाऊ दिलेला खर्च (4) आगाऊ मिळालेले उत्पन्न

During the accounting year ending 31st March 2000, rent paid up to 30th June 2000. The rent of April to June will be recorded as _________.

(1) Outstanding Expenses (2) Outstanding Income

(3) Pre-paid Expenses (4) Income received in advance

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

77. उत्पन्न व खर्च खाते यांची सुरुवात __________ बरोबर होत असते.

(1) नावे शिल्लक (2) जमा शिल्लक

(3) शिल्लक नसणे (4) वरीलपैकी कोणतेही नाही

The Income and Expenditure Accounts begins with :

(1) debit balance (2) credit balance

(3) no balance (4) none of the above

---

78. विक्री __________ या बरोबर समान आहे.

(1) वस्तूच्या विक्रीचा खर्च + नफा

(2) वस्तूच्या विक्रीचा खर्च – ढोबळ नफा

(3) ढोबळ नफा – वस्तूच्या विक्रीचा खर्च

(4) ढोबळ नफा – निव्वळ नफा

Sales are equal to __________.

(1) Cost of goods sold + Profit

(2) Cost of goods sold – Gross profit

(3) Gross profit – Cost of goods sold

(4) Gross profit – Net profit

---

79. मृतव्यक्तीच्या मृत्युपत्रानुसार अव्यापारी संस्थेला दिलेली रक्कम म्हणजे __________ होय.

(1) आजीवन सदस्यत्व शुल्क (2) मानधन

(3) वारसा (4) प्रवेश शुल्क

__________ is the amount given to a non-trading concern as per the will of a deceased person.

(1) Life Membership Fees (2) Honorarium

(3) Legacy (4) Entrance Fees

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

80. व्यवसाय व्यवहाराच्या नोंदी __________ नोंदवितात.
(1) कालक्रमानुसारच्या अनुक्रमा मध्ये (2) आठवड्याने
(3) दैनंदिन (4) महिन्याच्या शेवटी
Business transactions are recorded __________.
(1) In chronological order (2) Weekly
(3) Daily (4) At the end of the month

81. 1990 च्या दशकाच्या सुरुवातीला निर्माण झालेल्या समग्र आर्थिक आरिष्टाचे मुख्य कारण कोणते ?
(1) राजकोषीय असमतोल (2) नाजूक व्यवहारतोल स्थिती
(3) भाववाढीचा दबाव (4) वरील सर्व
What is the main cause of economic crisis of early 1990s ?
(1) Fiscal imbalance (2) Fragile balance of payment situation
(3) Inflationary pressure (4) All the above

82. भारतामध्ये विक्री कर सर्वप्रथम कोणत्या वर्षी लागु करण्यात आला ?
(1) 1905 (2) 1935 (3) 1939 (4) 1951
In which year, Sales Tax was imposed First time in India ?
(1) 1905 (2) 1935 (3) 1939 (4) 1951

83. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेचा खालीलपैकी कोणता करार सेवा कराराशी संबंधीत आहे ?
(1) गॅट (GATT) (2) गॅटस् (GATS) (3) ट्रीप्स (TRIPS) (4) ए.ओ.ए. (AOA)
Which of the following agreement of WTO is related to agreement on services ?
(1) GATT (2) GATS (3) TRIPS (4) AOA

84. पुढीलपैकी कोणत्या घटकांचा समावेश उदारीकरणामध्ये होतो ?
(a) औद्योगिक परवाना रद्द
(b) आयात भांडवली वस्तुंना स्वयंचलित मंजुरी
(c) उद्योजकांनी फक्त नवीन प्रकल्पांच्या माहितीचे निवेदन भरणे
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (b) आणि (c)
(3) फक्त (a) आणि (c) (4) वरील सर्व
Which of the following factors are included in Liberalisation ?
(a) Abolishing Industrial Licensing.
(b) Automatic clearance for imported capital goods.
(c) Filling information only of new projects by entrepreneurs.
**Answer options :**
(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c)
(3) Only (a) and (c) (4) All the above

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

85. विजय केळकर कार्यदलाने केंद्र सरकारसाठी वस्तु व सेवा कराच्या पुढीलपैकी कोणत्या करदरांची शिफारस केली होती ?

(a) 6 टक्के (b) 12 टक्के (c) 18 टक्के (d) 20 टक्के

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a), (b) आणि (c) (2) फक्त (a), (b) आणि (d)

(3) फक्त (b) आणि (c) (4) वरील सर्व

Which of the following tax rates were recommended by Vijay Kelkar Task Force for Centre Government ?

(a) 6 percent (b) 12 percent (c) 18 percent (d) 20 percent

**Answer options :**

(1) Only (a), (b) and (c) (2) Only (a), (b) and (d)

(3) Only (b) and (c) (4) All the above

---

86. खालीलपैकी कोणते घटक जी.एस्.टी. मधून वगळण्यात आले आणि ज्यावर राज्य सरकारने कर आकारावे ?

(1) मद्य व पेट्रोलियम उत्पादने (2) स्थावर मालमत्तेवरील मुद्रांक शुल्क

(3) वीज शुल्क (4) वरील सर्व

Which of the following items are excluded from the GST regime and to be taxed by the State Government ?

(1) alcohol and petroleum products (2) stamp duties on real estate

(3) electricity duties (4) all the above

---

87. दोहा विकास कामकाजा (दोहा जाहिरनामा) मध्ये __________ चा समावेश होता.

(1) वाटाघाटीच्या नवीन फेरीची सुरुवात

(2) कृषी अनुदाने

(3) पर्यावरण आणि श्रमाचा मुद्दा

(4) वरील सर्व

Doha Development Agenda (Doha Declaration) consists __________.

(1) Launch of a new round of negotiations

(2) Agricultural subsidies

(3) Environment and labour issues

(4) All above

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

88. 'राष्ट्रीय गुंतवणूक निधी' ची स्थापना पुढीलपैकी कोणत्या वर्षी करण्यात आली ?

(1) 1991 (2) 2000 (3) 2005 (4) 2015

Which of the following year, 'National Investment Fund' was established ?

(1) 1991 (2) 2000 (3) 2005 (4) 2015

89. पुढीलपैकी कोणते करार जागतिक व्यापार संघटनेशी संबंधित आहेत ?

(a) शेतीविषयक करार

(b) बौद्धिक संपदासंबंधीचा व्यापार करार

(c) वस्तु व व्यापारासंबंधीचा बहुपक्षी करार

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (a) आणि (c) (3) फक्त (b) आणि (c) (4) वरील सर्व

Which of the following agreements are related to World Trade Organisation ?

(a) Agreement on Agriculture

(b) Trade-Related Intellectual Property Rights

(c) Multilateral Agreements on Trade in Goods

**Answer options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (a) and (c) (3) Only (b) and (c) (4) All the above

90. मक्तेदारी व प्रतिबंधात्मक व्यापार पद्धती कायदा, 1969 रद्द करून पुढीलपैकी कोणता कायदा करण्यात आला ?

(1) विशेष आर्थिक क्षेम कायदा, 2005

(2) विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा, 1999

(3) वित्तीय जबाबदारी व अंदाजपत्रक व्यवस्थापन कायदा, 2002

(4) स्पर्धा कायदा, 2002

Which of the following act passed by cancelling Monopolies and Restrictive Trade Practices Act, 1969 ?

(1) Special Economic Zone Act, 2005

(2) Foreign Exchange Management Act, 1999

(3) Fiscal Responsibility and Budget Management Act, 2002

(4) Competition Act, 2002

91. जागतिक व्यापार संघटनेची स्थापना पुढीलपैकी कोणत्या दिवशी करण्यात आली ?

(1) 15 डिसेंबर, 1993 (2) 30 डिसेंबर, 1994

(3) 1 जानेवारी, 1995 (4) 1 फेब्रुवारी, 1995

On which of the following day, World Trade Organisation was established ?

(1) 15th December, 1993 (2) 30th December, 1994

(3) 1st January, 1995 (4) 1st February, 1995

---

92. सिंगापूर मुद्यामध्ये ________ चा समावेश होतो.

(1) व्यापार आणि गुंतवणूक यातील संबंध

(2) व्यापार आणि स्पर्धा धोरण यातील संबंध

(3) सरकारी खरेदीमध्ये पारदर्शकता आणि व्यापाराला सोयी पुरविणे

(4) वरील सर्व

Singapore issue consists ________.

(1) Relationship between trade and investment

(2) Interaction between trade and competition policy

(3) Transparency in Govt. purchase and trade facilitation

(4) All the above

---

93. भारत सरकारने स्विकारलेल्या समग्र आर्थिक स्थिरीकरण कार्यक्रमामध्ये ________ या सारख्या उपायांचा समावेश होतो.

(1) भाववाढ नियंत्रण

(2) वित्तीय समायोजन

(3) व्यवहारतोल स्थितीत सुधारणा

(4) वरील सर्व

The macroeconomic stabilisation programme adopted by the government of India consists measures like ________.

(1) Control of inflation

(2) Fiscal adjustment

(3) Improve the balance of payment position

(4) All the above

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

**94.** आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या (WTO) रचनेतील अत्यंत विषमतेमुळे मूलभूत करार आणि अनुषंगिक दुरुस्त्या खालीलपैकी कोणासाठी अनुकूल ठरल्या ?

(1) विकसनशील देश (2) विकसित देश
(3) सर्व सभासद देश (4) कोणत्याही सभासद देशासाठी नाही

Due to extreme inequality within the structure of WTO, basic agreements and subsequent amendments are stacked in favour of which of the following ?

(1) developing countries (2) developed countries
(3) all member countries (4) not any member country

---

**95.** कोणत्या उपायाने चलन पूर्ण परिवर्तनीय होते ?

(1) कोणत्याही सरकारी हस्तक्षेपाशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारात चलनाला स्वत:चे मूल्य ठरविण्याची परवानगी देणे.
(2) केंद्रीय बँक विनिमय दरावर नियंत्रण ठेवणे.
(3) राजकीय दृष्टीने आंतरराष्ट्रीय बाजारात चलनाला स्वत:चे मूल्य ठरविण्याची परवानगी दिली जाते.
(4) वरीलपैकी कोणताही नाही.

What makes currency fully convertible ?

(1) Allow currency to determine it's own exchange rate in international market without any official intervention
(2) The Central Bank have control on exchange rate
(3) All currency to determine it's own exchange rate in international market by politically
(4) None of the above

---

**96.** जागतिकीकरण पुढीलपैकी कोणत्या घटकांशी संबंधित आहे ?

(a) व्यापार अडथळ्यांमध्ये कपात (b) भांडवलाचा मुक्त प्रवाह
(c) तंत्रज्ञानाचा मुक्त प्रवाह (d) श्रमिकांचा मुक्त प्रवाह

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b), (c) आणि (d) (2) फक्त (a), (b) आणि (c)
(3) फक्त (a), (c) आणि (d) (4) वरील सर्व

Globalisation is related to which of the following factors ?

(a) Reduction in Trade Barriers (b) Free Flow of Capital
(c) Free Flow of Technology (d) Free Flow of Labour

**Answer options :**

(1) Only (b), (c) and (d) (2) Only (a), (b) and (c)
(3) Only (a), (c) and (d) (4) All of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

97. आर्थिक दृष्टीकोनातून जागतिकीकरण प्रवाहामध्ये _________ चा समावेश होतो.

(1) वस्तू व सेवांचा व्यापार (2) भांडवलाची हालचाल

(3) भांडवलाचे प्रचलन (4) वरील सर्व

From an economic point of view channels of globalisation consists _________.

(1) Trade in goods and services (2) Movement of capital

(3) Flow of finance (4) All the above

---

98. पुढीलपैकी कोणत्या करांऐवजी वस्तु व सेवा कर आकारण्याची शिफारस विजय केळकर समितीने केली ?

(a) सेनव्हॅट (CENVAT) (b) मॉडव्हॅट (MODVAT)

(c) सेवा कर (d) विक्री कर

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (a) आणि (c) (3) फक्त (c) आणि (d) (4) वरील सर्व

Which of the following taxes were replaced by Goods and Services Tax by the recommendation of Vijay Kelkar Committee ?

(a) CENVAT (b) MODVAT

(c) Service Tax (d) Sales Tax

**Answer options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (a) and (c) (3) Only (c) and (d) (4) All the above

---

99. करसुधारणा पूर्व काळात भारत हा असा देश होता की जेथे _________.

(1) सीमाशुल्क अनिश्चित आणि जटिल होते.

(2) सीमेवरील जकातीची पातळी जगामध्ये सर्वात जास्त होती

(3) सीमाशुल्क लवचिक आणि परिवर्तनशील होते

(4) वरील सर्व

During the pre-tax reform period, India had become a country _________.

(1) with the uncertain and complex customs duties

(2) with the highest level of customs tariff in the world

(3) with the flexible and elastic customs duties

(4) all the above

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

100. विशेष आर्थिक क्षेत्र कायद्याच्या उद्दिष्टांमध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश होतो ?

(a) वस्तु व सेवांच्या निर्यातीस प्रोत्साहन

(b) गुंतवणुकीस प्रोत्साहन

(c) रोजगार निर्मिती

(d) पायाभुत सुविधा विकास

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (c) आणि (d)

(3) फक्त (b) आणि (c) (4) वरील सर्व

Which of the following objectives are included in Special Economic Zone Act ?

(a) Promotion of exports of goods and services

(b) Promotion of investment

(c) Creation of employment opportunities

(d) Development of infrastructure facilities

**Answer options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (c) and (d)

(3) Only (b) and (c) (4) All of the above

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र.क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**